# पर्यावरण प्रतिज्ञा

भारत माझा देश आहे. सारे भारतीय माझे बांधव आहेत. माझ्या देशातील जैवविविधता, वन्यजीव व नैसर्गिक संपदेवर माझे प्रेम आहे. माझ्या देशातल्या समृद्ध व विविधतेने नटलेल्या वनराई व वन्यजिवांचा मला अभिमान आहे.

या जैवविविधतेच्या संवर्धन व स्वच्छ पर्यावरणासाठी मी या दिवाळी फटाके फोडणार नाही , कारण फटाक्यात मोठ्या प्रमाणावर विषारी घटक असतात. त्यातील तांबे, कॅडमियम, शिसे, मॅग्नेशियम, जस्त, सोडियममुळे फटाके उडविल्यानंतर त्यामधुन विषारी वायू उत्सर्जित होऊन श्वसन संस्था, मज्जा संस्थेवर विपरीत परिणाम होतो, त्यामुळे मोठ्या प्रमाणावर हवेचे प्रदुषण होते.

फटाक्यांच्या उत्पादनामध्ये खुप मोठ्या प्रमाणात बालमजुरांकडुन काम करुन घेतल्या जाते या मुळे हजारो मुले आरोग्याने पिडीत आहेत, तसेच फटाके बनविण्यासाठी दरवर्षी लाखो टन न्युज पेपररद्दीच्या कागद पुर्नवापर होण्याऐवजी फटक्यांमध्ये वापरुन जाळला जाते.मग नविन कागद निर्मितीसाठी मोठ्या प्रमाणावर वृक्षतोड होते.

मी माझ्या वृक्षवल्ली-वन्यजीव, सभोवतालच्या जल, मृद आणि वायु या घटकांना सांभाळणाऱ्या पर्यावरणाचा मान ठेवीन आणि त्यांच्या संवर्धनासाठी दरवर्षी पर्यावरण पुरक दिवाळी साजरी करेन व माझ्या देशातील नैसर्गिक संपदा आणि पर्यावरण यांचे सुसंगत शाश्वत विकास करण्याची मी प्रतिज्ञा घेत आहे.

या समृद्ध जैवविविधतेचे जतन व वृद्धी करण्यातच माझे सौख्य समावले आहे.

***चला पर्यावरण पुरक दिवाळी साजरी करुया...***
***पर्यावरण संवर्धन करु या.. आणि आनंद फुलवु या...***

आदरणीय मुख्याध्यापक/मुख्याध्यापिका,
विद्यार्थ्यांमध्ये पर्यावरण पुरक दिवाळी साजरी करण्याबाबत जागृती होण्यासाठी,
कृपया वरील प्रतिज्ञा प्रार्थनेच्या वेळेस विद्यार्थ्यांकडून म्हणवून घ्यावी, हि नम्र, विनंती.

-निसर्गकट्टा